१४) परवानगी मिळालेली व्यक्ती कृषीतर प्रयोजनासाठी जमिनिचा वापर करण्यास प्रारंभ केल्याच्या दिनांकापासुन एक महिन्यांच्या आंत मोजणी फी देईल.

१५) या आदेशामध्यें आणि सनदेमध्ये उल्लेखिलेले क्षेत्रफळ व कृषीतर आकारणी ही सर्वेक्षण विभागाने जमिनिची मोजणी केल्यानंतर प्रत्यक्ष आढळून येईल त्या क्षेत्रफळानुसार फेरबदल केली जाण्यास पात्र ठरेल.

१६) परवानगी मिळालेली व्यक्ती जमिनिचा कृषीतर वापर करण्यास प्रारंभ केल्यांच्या दिनांकापासुन तीन वर्षाच्या कालावधीत त्या जमिनिवर पक्की इमारत आणि किंवा इतर बांधकाम करील उक्त व्यक्तीने, शासकीय आदेशानुसार वसवता येईल असा दंड हप्ता दिल्यानंतर औरंगाबादच्या जिल्हाधिकारी यांच्या स्वेच्छनिर्णयानुसार त्यास उक्त कालावधी वाढवता येईल.

१७) जिल्हाधिकारी औरंगाबाद नगर परिषद/ नगररचना विभाग (यथास्थिती) यांची पुर्व परवानगी घेतल्याखेरीज आणि त्या संबधीचे नकाशे मंजुर करुन घेतल्याखेरीज मंजुर नकाशावर हुकुम अगोदरच बांधलेल्या इमारतीमध्ये कोणतेही जादा बांधकाम करणार नाही किंवा त्यात फेरफार करणार नाही.

१८) परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनिच्या अ वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ या सोबत जोडण्यात आलेल्या अनुसुची चार किंवा पांच मध्ये दिलेल्या नमुन्यात वस्तु सनद करुन देणे, - तिच्यावर बंधनकारक असेल, अशा सनदे मध्ये या आदेशातील सर्व शर्तींचा समावेश करणे आवश्यक असेल. आणि — च्या कृषीतर वापर करण्यास प्रारंभ केल्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या कालावधीत सनद करुन देणे बंधनकारक असेल.

अबद-१		
(३९७	३०	४५
२०२१		

१९(अ) परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीने या आदेशामध्ये आणि सनदीमध्ये नमूद करण्यात आलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लधन केल्यास, उक्त अधिनियमांच्या उपबंधान्वये उक्त व्यक्ती ज्या शास्तीस पात्र ठरेल त्या इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता जिल्हाधीकारी औरंगाबाद यांस निर्देश देतील तितका दंड व आकारणीची रक्कम भरल्यानंतर उक्त जमीन प्लॉट अर्जदारांच्या ताब्यात असणे चालु ठेवता येईल.

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No. सत्यमेव जयते

ब) वरिल खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, जिल्हाधीकारी/ ~~उप विभागीय अधिकारी / तहसिलदार.~~ औरंगाबाद यांनीत्यान्वये देण्यात आलेल्या परवानगीतील तरतुदीच्या विरुध्द उभारण्यात किंवा वापरण्यात आलेली कोणतीही इमारत किंवा बांधकाम हे त्याने त्या संबधात विनिर्दिष्ट केला असेल त्या कालावधीत काढून टाकण्याबध्दल किंवा त्यात फेरबदल करण्याचा निर्देश देणे हे कायदेशिर असेल. आणि या प्रमाणे नष्ट करण्याचे किंवा फेरबदल करण्याचे काम विनिर्दिष्ट कालावधीत पार पाडले गेलेले नाही तर तो ते काम पार पाडण्याची व्यवस्था करील आणि ते काम पार पाडण्यासाठी आलेला खर्च परवानगी मिळालेल्या व्यक्तीकडून जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसुल करील.

१०) जोडपत्र "अ" अनुसार जादा शर्ती"

ही परवानगी त्या वेळी अमलांत असलेल्या व या प्रकरणातील इतर संबधंद गोष्टींना लागु होणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यातील म्हणजेच हैद्राबाद कुळ वहिवाट आणि शेतजमीन अधिनियम १९५० महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम नगर पालिका अधिनियम इत्यादितील तरतुदीत अधीन ठेवून देण्यात आलेली आहे.

~~स्वाक्षरीत~~

स्वाक्षरीत

जिल्हाधीकारी, औरंगाबाद

श्री रामराव केशवराव मुख्य प्रवर्तक ~~कल्पतरु स.गृ.नि.सं.~~ राहणार ~~तालुका~~ गारखेडा औरंगाबाद

मान्यता देण्यात आलेल्या नकाशासह प्रत रवाना.

औरंगाबाद चे ~~इस्त~~ तहसिलदार यांना (जिल्हाधीकारी/उप विभागीय अधिकारी यांनी परवानगी दिली असेल त्या प्रकरणी प्रकरणाच्या कागदपत्रासह फाईल्स प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No.1
सह दुय्यम निबंधक औरंगाबाद क्रं. १
सत्यमेव जयते

अ ब ग - १
८३९८ | ३१ | ४५
२०२१

(7)

२. तहसिलदाराने, परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीकडूनयेणा-या जमिनिच्या अकृषिक वापरास वेळेवर प्रारंभ करण्यात आला असल्या बाबतच्या प्रतिवेदनावर लक्ष ठेवावे. हा अहवाल मिळाल्यानंतर त्याने जमिनिच्या अकृषिक वापरास प्रारंभ झाल्याच्या तारखेपासुन उक्त व्यक्तीकडुन अकृषिक आकारण्याची वसुली करण्यासाठी आणि सनद करुन घेण्यासाठी टी एफ दोन व चार आणि व्ही एफ नमुना दोन व चार यामध्ये अकृषिक नोदवहित आवश्यक त्या नोदी घेण्याची कार्यवाही करावी.

भोगवटादार भोजगीशुल्क भरत असेल तर त्यानी मंजुर करण्यात आलेले नकाशे (प्लॅनस) व संबधित जमिनिच्या बाबतचे अभिकार अभिलेखातील संबधीत उतारे यासह जिल्हा निरिक्षक भुमि अभिलेख औरंगाबाद यांना सदर कळवावे.

३. जिल्हा निरिक्षक भुमि अभिलेख औरंगाबाद याच्याकडे आगाउ प्रत माहितीस्तव करिता रवाना.

४. अप्पर तहसिलदार अकृषी जिल्हा कार्यालय औरंगाबाद

५. सहाय्यक जिल्हाधीकारी औरंगाबाद/वैजापुर यांना माहितीस्तव

(signature)

जिल्हाधिकारी औरंगाबाद करिता

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No. 1
सह दुय्यम निबंधक औरंगाबाद क्रं. १
सत्यमेव जयते

अ ग ग-१		
८३९७	३२	४५
२०२१		

२०

जा·क्र·मनपा/नरवि/रेखांकन/ १९८७ /८६
महानगरपालिका, औरंगाबाद
दिनांक:- १९-८-८८

आ_दे_श_:

श्री/श्रीमती चेअरमन, ... सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित
मौजे मोहल्ला/मौजे गारखेडा औरंगाबाद येथील नगर भूमापन क्र·/स·न·/गट नंबर ७६/१/३---मधील दाखल केलेल्या रेखांकनास---... रंगाने दुरुस्ती केल्या ... अंतिम मंजूरी खालील अटीवर दिली जाते·

१] सर्व भूखंडाचा वापर निवासासाठी करण्यांत यावा·

२] रेखांकनामधील प्रत्येकी स्वतंत्र भूखंडाचे क्षेत्र २५० चौ·मि·पेक्षा कमी असू नये व सेमी डिटॅच भूखंडाचे क्षेत्र १२५ चौ·मि·पेक्षा कमी असू नये·

३] मंजूर केलेल्या भूखंडास पून्हा पोट विभागणी करून देण्यांत येणार नाही·

४] रेखांकना मधील खूली जागा ही कायमची खूली जागा ठेवावी लागेल·

५] श्री/श्रीमती सोसायटी तर्फे चेअरमन श्री विजय श्री ... यांनी रेखांकनामधील अंतर्गत रस्ते व खूल्या जागेचे हस्तांतर महानगरपालीकेस दुय्यम निबंधक [नोंदणी] यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक ---८३८४---दि·१८-८-८८ अधारे करून दिलेली आहे· सदरची मालकी महानगरपालीकेची आहे·

६] भूखंडा मध्ये बांधकाम, नियमा प्रमाणे या कार्यालयाची परवानगी घेऊन करण्यांत यावे· तसेच करण्यांत येणारे बांधकाम, बांधकाम उपविधी [बिल्डिंग बाय लॉज] नियंत्रण नियमावली [डेव्हलपमेंट कंट्रोल रूल] च्या अनुषंगाने करावे लागेल·

७] भविष्यांत रहदारीच्या दृष्टीकोनातून आणखी रस्ता रूंदीसाठी जागेची गरज भासल्यास ती भूमीसंपादन कायदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार संपादन करण्यांत येईल· मात्र सोसायटीस/भूखंड धारकास नियमाप्रमाणे मोबदला दिला जाईल·

८] विकास कामे सुरु करण्यापूर्वी/भूखंडावर बांधकाम परवानगी घेण्यापूर्वी रेखांकनाच्या जागेचे सपाटीकरण करून द्यावे लागेल·

भूखंडा मधील बांधकाम परवानगी घेण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवरील भुखंडाचा नकाशा नगर भूमापन कार्यालयातून तयार करून घ्यावा लागेल·

भूखंडातून महानगरपालिकेच्या मालकीची पाण्याची लाईन/भूमीगत गटार गेलेली असेल तर ती स्वखर्चाने स्थलांतर करावी लागेल·

Seal of the Jt. Sub-Registrar, सह दुय्यम निबंधक औरंगाबाद क्रं. १, Aurangabad No.1, सत्यमेव जयते

औबाद-१		
८३८४	३३	४५
२०२१		

...[२]....